

सो.रजि.नं.एम.एच.५१४/ए/एन/आर/८२,बी.पी.टी.रजि.नं.एफ/४६८ (अहमदनगर)
एन.एस.के./टेक/१२ ए. (ए)/५८/१९९४-९५

# श्री मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट निघोज

**ता. पारनेर, जि. अहमदनगर**



जा.क्र. मळगंगा ट्रस्ट/७४/२०२५-२६ दिनांक : ०९/१०/२०२

प्रति
मान . लोकनेते श्री . निलेशजी लंके साहेब,
खासदार, अहिल्यानगर दक्षिण मतदार संघ .

विषय - श्री क्षेत्र कुंड पर्यटन स्थळ निघोज येथे पर्यटक विसावा केंद्र (मंगल कार्यालयासाठी) टेबल व खुर्च्यासाठी निधी मिळणेवावत...

मा . महोदय,

वरील विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, श्री मळगंगा देवस्थानला जानेवारी २०११ मध्ये "ब" वर्ग तिर्थक्षेत्र दर्जा प्राप्त झालेला असून पर्यटन व तिर्थक्षेत्राच्या माध्यमातून मोठया प्रमाणावर विकासकामे झालेली आहेत . ही विकासकामे करत असताना आपण मोलाचे सहकार्य केल्यामुळे आपले श्री मळगंगा ट्रस्टच्या वतीने आभार व्यक्त करण्यात येत आहेत . लाखो भाविक महाराष्ट्रातूनच नव्हे तर संपूर्ण देशातून श्री क्षेत्र कुंड पर्यटन स्थळाला भेट देतात . आजरोजी श्री क्षेत्र कुंड पर्यटन स्थळ निघोज येथे पर्यटक विसावा केंद्र (मंगल कार्यालय) खासदार साहेब आपल्या माध्यमातून पुर्ण होण्याच्या मार्गावर असून त्यासाठी अंदाजे १०० टेबल व १,४०० खुर्च्यांची गरज आहे . लग्नकार्यासाठी टेबल व खुर्च्या असल्याने आलेल्या पाहुण्यांची गैरसोय होणार नाही .

तरी आपण टेबल व खुर्च्यांसाठी १० ते ११ लाखांचा खर्च आहे . तरी तो निधी उपलब्ध करून सहकार्य करावे ही नम्र विनंती .

कळावे .

आपला विश्वासू,

[signature]

श्री . विश्वास ठकाराम शेटे
सहसचिव
श्री मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट निघोज